ePaper एकाच दिवशी 78 खासदार निलंबित; संसद सदस्यांवरील कारवाईचा विक्रम

| वर्ष - 7 | अंक - 221 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- या खेळाडूंवर पडणार पैशांचा पाऊस!
- किंग खान 'छैय्या छैय्या' वर थिरकला
- कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाची भेट!
- सोलार स्फोटाचे विधिमंडळात पडसाद

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 19 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## प्रस्तावित कचरा डेपोचे आरक्षण रद्द : राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

# पुनावळेकरांचा ऐतिहासिक विजय!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार अश्विनी जगताप यांची लक्षवेधी : कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांचे सकारात्मक उत्तर**

**नागपूर: पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रस्तावित कचरा डेपोविरोधात पुनावळेकरांनी एकजूट केली आणि प्रशासनाला विरोध केला. या लढाईत सर्वपक्षीय नेत्यांनी सकारात्मक साथ दिली. त्याला यश मिळाले असून, राज्य शासनाच्या वतीने सदर कचरा डेपो प्रकल्प रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहे.**

चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार अश्विनी जगताप यांनी हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले. त्याला कॅबिनेटमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. "प्रकल्प रद्द करण्याचे आदेश त्वरित देणार" अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी दिली. पिंपरी-चिंचवड सोसायटी हाउसिंग फेडरेशन, समस्त पुनावळेकर, आमदार अश्विनी जगताप, नवनाथ ढवळे, संदीप पवार, चेतन भुजबळ, सचिन लोंढे, राहुल काटे, अमित काटे, सागर लेंडवे यांच्या गेल्या ३ महिन्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

### सर्वपक्षीय नेत्यांची सकारात्मक भूमिका...

मध्यंतरी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची स्थानिक भूमिपुत्रांनी भेट घेतली होती. त्यानंतर महापालिकेत झालेल्या बैठकीत प्रकल्पाला स्थगिती देण्याबाबत सूचना केली होती. शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले होते. "मोशीतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू असताना. नव्या कचरा डेपोची खरंच आवश्यकता आहे का?" याचा अभ्यास करुन निर्णय घेतला जाईल. आम्ही पुनावळेकरांसोबत आहोत, अशी भूमिका भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी घेतली होती. तसेच, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांनी पुनावळे कचरा डेपोविरोधात साखळी उपोषण करीत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लक्षवेधी चर्चेद्वारे या मुद्याकडे लक्ष वेधले होते. शहरातील सर्वपक्षीय स्थानिक नेते आणि पुनावळेतील सदनिकाधारकांनी केलेल्या एकत्रित प्रयत्नांना राज्य सरकारचा सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे.










### 'महाईन्यूज' ठरले आंदोलनाचे मुखपत्र...

» पुनावळे प्रस्तावित कचरा डेपोविरोधात जनआंदोलन उभा राहिले. शहरातील सर्व प्रमुख प्रसारमाध्यमांनी "कचरा डेपो होणारच..." अशी भूमिका घेतली होती. किंबहुना, प्रशासनाने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींपर्यंत एकतर्फी माहिती पोहोचवली होती.

मात्र, सुरूवातीपासून 'महाईन्यूज' ने कचरा डेपोविरोधात पुनावळेकरांची बाजू प्रखरपणे मांडली. आंदोलनाची प्रत्येक भूमिका मांडत असताना सदनिकाधारक आणि स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती केली. तब्बल ७ हजार दुचाकीस्वारांची रॅली या आंदोलनाचा 'टर्निंग पाईंट' ठरला. सर्वपक्षीय आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सोसायटीधाराकांच्या या प्रश्नाचा मुद्दा गांभीर्याने घेतला. या आंदोलनाचे मुखपत्र म्हणून 'महाईन्यूज' अग्रभागी राहिले आहे.






> पुनावळे येथील २६ हेक्टर जागा २००८ साली कचरा डेपोसाठी आरक्षीत करण्यात आली. गेल्या १५ वर्षांत या भागात सुमारे १ लाख नागरिक वास्तव्यास आहेत. या प्रकल्पाला केंद्र शासनाची तत्त्वत: मान्यता दिली आहे. केंद्राच्या निर्देशानुसार ५ वर्षांच्या आत आरक्षणाची पूर्तता न झाल्यास आरक्षण रद्द केले जाते. तरीही महापालिका प्रशासनाने १५ वर्षांनंतर हा प्रकल्प हाती घेण्याबाबत कार्यवाही सुरू केली. प्रकल्प अहवालानुसार विहीत वेळेत अटी-शर्तींची पूर्तता केली नाही. केंद्र सरकारने अंतिम मंजुरी दिलेली नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही.
>
> **- अश्विनी जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

> घनकचरा व्यवस्थापनासाठी २६ हेक्टर जागा अपेक्षित होती. त्यासाठी वन खात्याने पर्यायी जागा मागितली होती. त्यानंतर मुळशी आणि चंद्रपूर येथील जागा दाखवण्यात आली. चंद्रपूरची जागाही वनखात्याने नाकारली आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प करताना स्थानिक नागरिकांना कोणताही त्रास होईल, अशी भूमिका घेता येणार नाही. पुनावळेतील सदर घनकचरा प्रकल्प रद्द केला जाईल. त्यासाठी पर्यायी जागा शोधली जाईल. यापुढील काळात राज्यातील महापालिका हद्दीतील हरित क्षेत्रांमध्ये विकासप्रकल्प राबवण्यासाठी जागा ताब्यात घेताना. त्याच क्षेत्रात ग्रीन बेल्ट विकसित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.
>
> **- उदय सामंत, कॅबिनेट मंत्री.**

# फटाका स्टॉलधारकांना महापालिकेचा दणका!

## » नदीपात्रात कचरा टाकल्याने दंडात्मक कारवाई

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेने नियमावली केली असली, तरी शहरातील फटाका स्टॉलधारकांनी मात्र या नियमावलीला हरताळ फासल्याचे स्पष्ट झाले आहे. दिवाळीच्या कालावधीत नदीपात्रात उभारलेल्या फटाका स्टॉलधारकांनी स्टॉल काढल्यानंतर राडारोडा तेथेच टाकल्याने त्यांच्यावर कारवाईचा बडगा महापालिकेने उगारला आहे. अस्वच्छता केल्याप्रकरणी नदीपात्रातील ३४ स्टॉलधारकांच्या अनामत रकमेतून दंडाची रक्कम वसूल करावी, असा प्रस्ताव कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाने मालमत्ता व्यवस्थापन विभागाला दिला आहे.**



दिवाळीच्या कालावधीत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडून नदीपात्रात फटाका विक्री स्टॉल उभारण्यास परवानगी दिली होती. ऑनलाइन लिलाव पद्धतीने गाळे भाड्याने देण्यात आले होते. स्टॉलधारकांनी दैनंदिन कचरा घंटागाडीला द्यावा, अशी लेखी सूचना त्यांना देण्यात आली होती. मात्र स्टॉलच्या आजूबाजूचा परिसर आणि स्टॉल खालील बाजूला साठणारा कचरा तसाच ठेवण्यात आला होता. दिवाळीनंतर एक एक स्टॉल काढण्यात आले; मात्र स्टॉलधारकांकडून कचरा तसा ठेवण्यात आला होता. त्याबाबतचे छायाचित्र ‘लोकसत्ता’ने २१ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केले होते.

शहरातील प्रदूषण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर फटाका स्टॉलधारकांचा निष्काळजीपणा पुढे आल्यानंतर कसबा-विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त अमोल पवार यांनी त्याची दखल घेतली होती. कामात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी क्षेत्रीय कार्यालयातील आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेण्यात आली. त्यानंतर आरोग्य निरीक्षकांकडून स्टॉलधारकांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडून फटाका स्टॉलधारकांना व्यवसायाची परवानगी देण्यात आली होती. त्यापोटी त्यांच्याकडून काही अनामत रक्कमही घेण्यात आली होती. या रकमेतून दंडाची रक्कम वसूल करावी, असा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाने मालमत्ता व्यवस्थापन विभागाला दिला आहे, अशी माहिती सहायक आयुक्त अमोल पवार यांनी दिली.

### पावती दाखविल्यानंतरच अनामत रक्कम मिळणार

» स्टॉलधारकांकडून राडारोडा तसाच टाकण्यात आल्यानंतर त्यांच्यावर यापूर्वीच दंडात्मक कारवाई करण्यात येणार होती. या सर्व ३४ स्टॉलधारकांना एकत्रित दंड ठोठावण्यात येणार होता. त्याला स्टॉलधारकांनीही सहमती दर्शविली होती. मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता दंड भरणार नाही, असा पवित्रा स्टॉलधारकांनी घेतल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले. महापालिकेच्या नियमानुसार स्टॉलधारकांना किमान पाचशे रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. क्षेत्रीय कार्यालयाकडे दंड भरल्याची पावती दाखविल्यानंतरच त्यांना अनामत रक्कम मिळणार आहे, असे पवार यांनी सांगितले.

---

# देहू कॅन्टोन्मेंट हद्दीतील कचऱ्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांना त्रास!

## » आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी: कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांचे सकारात्मक उत्तर!

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देहूरोड कॅन्टोन्मेंट क्षेत्रातील कचरा पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीलगत मोठ्या प्रमाणात जाळला जातो. याचा रुपीनगर आणि तळवडे भागातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे राज्य सरकारने पुढाकार घेवून कॅन्टोन्मेंट हद्दीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प उभारावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली.**




नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवडमधील प्रस्तावित पुनावळे कचरा डेपोबाबत लक्षवेधी चर्चा झाली. या चर्चेत आमदार लांडगे यांनी सहभाग घेतला. राज्य सरकारने पुनावळेतील स्थानिक नागरिकांचा विचार करुन कचरा डेपो रद्द केला. याबद्दल आमदार अश्विनी जगताप यांचे अभिनंदन आणि राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. तसेच, मोशी कचरा डेपोवर येणारा ताण आणि देहू व आळंदी तीर्थक्षेत्रातील कचरा समस्येवरही लक्ष वेधले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, गेल्या ४० वर्षापासून मोशी आणि परिसरातील नागरिक कचरा डेपोची दुर्गंधी सहन करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या ठिकाणी ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्प कार्यान्वयीत करण्यात आला आहे. सध्यस्थितीला देहू कँटोन्मेंट हद्दीमध्ये कचरा प्रक्रिया प्रकल्प नाही. संकलित होणारा रोजचा कचरा रुपीनगर- तळवडे गावांच्या हद्दीलगत जाळला जातो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. धूर आणि दुर्गंधी यामुळे नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. यावर महापालिकेने कँटोन्मेंटला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत पत्र दिले होते. मात्र, त्यावर कारवाई झाली नाही. त्यामुळे तो कचरा मोशी कचरा डेपोवर घ्यावा लागतो.

श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदी येथे राज्य सरकारकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. देहू आणि आळंदीत कचरा प्रकल्प उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच, देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीतील कचरा अनधिकृतपणे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत जाळला जातो. त्यावर काही निर्देश राज्य सरकार देणार आहे का? असा प्रश्न आमदार लांडगे यांनी उपस्थित केला. यावर कॅबिनेट मंत्री उदय सामंत म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि देहू कॅन्टोन्मेंट तसेच श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदी येथील घनकचरा प्रकल्पासाठी राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेईल.

> “ पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपो स्थानिक नागरिक, नव्याने विकसित झालेल्या गृहनिर्माण संस्था तसेच शाळा-महाविद्यालये यामुळे रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या निर्णयाचे आम्ही स्वागत करीत आहोत. यासोबत मोशी कचरा डेपोवर देहू कॅन्टोन्मेंट हद्दीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आणला जातो. किंवा अवैधपणे हा कचरा महापालिका हद्दीत जाळला जातो. त्याचे परिणाम आम्हा पिंपरी-चिंचवडकरांना भोगावे लागत आहेत. यावर उपाययोजना करण्याबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे.
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

## मालमत्ता कराबाबत राज्य सरकारचा मोठा निर्णय

# महापालिकेत जाण्याची गरज नाही!

## सदनिका खरेदीदाराचे नाव 'टॅक्स पेयर' म्हणून लागणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सदनिका खरेदी केल्यानंतर खरेदीदाराचे नाव 'टॅक्स पेयर' म्हणून आपोआप लागणार आहे. त्याकरिता महापालिकेत जाऊन स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नाही. ही सुविधा राज्यात मुंबई आणि पनवेल महानगरपालिकांमध्ये सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील तब्बल १४ महानगरपालिकांनी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला ही सुविधा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविला आहे. त्यानुसार येत्या आठ दिवसांत या महापालिकांच्या हद्दीत ही सुविधा सुरू करण्यात येणार आहे.**



### लवकरच ही सुविधा सुरू होणार : देशमुख

खरेदी-विक्री दस्त झाल्यानंतर महापालिकेकडील आणि दस्तातील माहिती १०० टक्के जुळल्यानंतर तातडीने नव्या खरेदीदाराचे नाव करदाता म्हणून लागेल. अन्यथा महापालिकेकडून खरेदीदाराला संपर्क केला जाईल. नोंदणी विभागाकडून खरेदी-विक्रीदाराचे नाव, मालमत्तेचा तपशील आदी अनुषंगिक माहिती स्वयंचलित पद्धतीने पाठविली जाणार आहे. नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगाव, भिवंडी, नगर, मिरा-भाईंदर, वसई-विरार, लातूर, इचलकरंजी, कोल्हापूर आणि अकोला या महापालिकांनी प्रस्ताव दिले आहेत. लवकरच ही सुविधा सुरू होणार आहे, असे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचे उपमहानिरीक्षक (संगणक) अभिषेक देशमुख यांनी सांगितले.

इज ऑफ डुइंग बिझनेस उपक्रमांतर्गत जागतिक बँकेकडून दिल्ली आणि मुंबई ही दोन शहरे निवडण्यात आली होती. त्याअंतर्गत नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबईत ही सुविधा सन २०१९ पासून सुरू आहे. पनवेल महापालिकेने नुकतीच ही सुविधा सुरू केली. सध्या मालमत्ता, घर खरेदी केल्यानंतर खरेदी करणाऱ्याला जुन्या मालकाचे नाव वगळून आपले नाव लावण्यासाठी संबंधित महापालिका किंवा नगरपालिकांकडे स्वत: जाऊन (ऑफलाइन) अर्ज करावा लागतो.

मालमत्ता खरेदीबाबत नोंदणी झाल्यानंतर त्यांचे ऑटो म्युटेशन होणे आवश्यक आहे. एखाद्या मालमत्तेची खरेदी-विक्री झाल्यानंतर प्रॉपर्टी कार्ड आणि टॅक्स पे रेकॉर्ड यांवर त्याची नोंद होते.

या दोन्ही ठिकाणी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून आता ऑटो म्युटेशनद्वारे माहिती पाठविण्याची सुविधा आहे. म्हणजे प्रॉपर्टी कार्ड अपडेट करण्यासाठी सर्व्हर ते सर्व्हर माहिती पुढे पाठवता येऊ शकते. त्यासाठी विभागाचा सर्व्हर आणि संबंधित महापालिकेचा सर्व्हर यांचे एकत्रीकरण करण्याची सुविधा आहे. त्यामुळे सदनिका खरेदी करणाऱ्यांना महापालिकेत जाऊन स्वत:चे नाव मिळकतीवर लावण्यासाठी स्वतंत्र अर्ज करायची गरज नाही.

---

# पात्र ३८८ उमेदवारांसाठी आमदार लांडगे सरसावले!

## अधिवेशनात मुद्दा मांडणार : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने भरती प्रक्रिया राबवून वर्षभर झाले. उमेदवार निश्चितीसुद्धा झालेली आहे. मात्र, त्यांना रुजू करून घेण्यास प्रशासकीय दिरंगाई होत आहे. याबाबत संबंधित उमेदवारांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ रुजू करून घ्यावे. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, हिवाळी अधिवेशनात मुद्दा मांडणार असल्याचे म्हटले आहे.**





"महापालिका प्रशासकीय यंत्रणेवर येणारा ताण, मनुष्यबळाचा अभाव यामुळे कामकाजावर परिणाम होत आहे. गतीमान कारभार चालवण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध असणे अपरिहार्य आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ रुजू करून घेणेबाबत कार्यवाही करण्याची अपेक्षा आहे. मात्र, दप्तरदिरंगाई सुरू आहे. याबाबत अधिवेशनात मुद्दा मांडण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना वेळ मागितली आहे.

**–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र दिले आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रचंड ताण असून, मनुष्यबळ भरती अपरिहार्य आहे. राज्य सरकारने नोकर भरतीवरील निर्बंध उठवल्यानंतर महापालिकेच्या विविध विभागांतील 'ब' आणि 'क' गटातील १५ पदांच्या ३८८ जागांसाठी परीक्षा घेतली होती. त्यासाठी राज्यभरातून ८५ हजाराहून अधिक उमेदवारांनी अर्ज केले होते.

महापालिकेने अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी, उद्यान अधीक्षक (वृक्ष), उद्यान निरीक्षक, हॉर्टिकल्चर सुपरवायझर, न्यायालय लिपिक, ॲनिमल किपर, समाजसेवक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, लिपिक, आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत) या संवर्गातील रिक्त जागांसाठी प्रशासनाने भरती प्रक्रिया राबवली आहे. त्याची परीक्षा झाली असून, उमेदवारांना नियुक्ती देणे प्रलंबित आहे. मात्र, प्रशासनाने अद्याप ही कार्यवाही पूर्ण केलेली नाही. याबाबत विधीमंडळ अधिवेशनामध्ये मुद्दा मांडण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना अर्ज दिला आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.




# भारतातले बेकायदा बांगलादेशी

**संयुक्त राष्ट्रांच्या ठरावानुसार १८ डिसेंबर हा ‘आंतरराष्ट्रीय स्थलांतरित व निर्वासित दिवस’ म्हणून पाळला जातो. २१ जून हा ‘योग दिवस’ म्हणून जसा संयुक्त राष्ट्रांच्याच ठरावानुसार साजरा होतो, तसाच १८ डिसेंबर हा गरीब, हिंसाग्रस्त देशांमधून जरा सुरक्षित देशांमध्ये कायदेशीरपणे वा बेकायदा आलेल्या स्थलांतरितांसाठी.**

यंदा नेमकं या दिवसाच्या आदल्या आठवड्यात ब्रिटननं निर्वासित/ स्थलांतरितांसाठी ठरवलेलं ‘रवांडा धोरण’ मंजुरीच्या मार्गाला लागलं आणि १६ डिसेंबरच्या शनिवारी रात्री, युरोपकडे निघालेल्या बेकायदा स्थलांतरितांची एक नौका समुद्रात उलटून ६१ जण बुडून मरण पावल्याची भीती, अशी बातमी आली. अशा बेकायदा स्थलांतराच्या प्रयत्नात फक्त २०२३ सालामध्ये जीव गमावलेल्यांची संख्या २२०० हून जास्त आहे... पण आपणा भारतीयांना या बातम्यांचं काही वाटत नाही... कारण ‘निर्वासित’ , ‘स्थलांतरित’ म्हटलं की आपल्याला आठवतात ते बांगलादेशी घुसखोर! हे लोक- म्हणजे बांगलादेशी वगैरे- आपला मायदेश सोडून येतात, म्हणजे त्यांना देशाभिमान नसतोच आणि हे असले- स्वदेशही आपला न मानणारे लोक कुठेही घातक, असं आपण सर्रास समजतो. कोणत्याही देशात कोणीही घुसखोरी करू



नये, प्रत्येक देशातल्या कायदेशीर नागरिकानं आपापल्या देशातच अभिमानानं जगावं, ही आदर्श स्थिती. ती हे लोक पाळत नाहीत. म्हणूनच ‘त्यांचे कसले दिवस साजरे करायचे?’ हा प्रश्न बहुसंख्य देशप्रेमी भारतीयांच्या ओठांवर असणं साहजिक आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष या पदावर असताना अमित शहा यांनी याच भावनेला आवाहन केलं होतं. भारतात सुमारे ४० लाख बांगलादेशी घुसखोर आहेत आणि ही वाळवी आपल्याला काढून टाकायची आहे, असं ते म्हणाले होते. पुढे अमित शहा भारताचे गृहमंत्री झाले, त्यांच्या खात्यातर्फे ‘नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक’ मांडलं गेलं, कितीही निदर्शनं झाली तरी या विधेयकाचा कायदाही ११ डिसेंबर २०१९ रोजी झाला... आता त्याचे नियम आखले जाण्याची प्रक्रियाच तेवढी बाकी आहे! या प्रक्रियेसाठी २०२० पासून आजतागायत आठ वेळा केंद्रीय गृह मंत्रालयानं मुदतवाढ मागितली. ही मुदतवाढ लोकसभेच्या ‘संसदीय दुय्यम विधिविधान समिती’ (कमिटी ऑन सबऑर्डिनेट लेजिस्लेशन) कडे मागावी लागते. या समितीनं ऑगस्टमध्ये दिलेली सहामाही मुदतवाढ जेव्हा मार्च २०२४ मध्ये संपेल, तोवर हे नियम तयार झालेले असतील असं भाजपच्या एका सभेत केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार मिश्रा म्हणाले होते. मात्र बांगलादेशी घुसखोर जसे आपल्या देशात बेकायदा येतात, तसे भारतीय लोकसुद्धा अमेरिकेत बेकायदा जातात. अमेरिका अशा सर्व देशांतून आलेल्या बेकायदा स्थलांतरितांची नेमकी माहिती ठेवते, इतकंच नव्हे तर वेळोवेळी ती संबंधित देशांना पुरवतेसुद्धा. अमेरिकेतले हे भारतीय काही हिंसक कारवाया करण्यासाठी आलेले दुष्ट लोक नसतात. बऱ्याच जणांना बिचाऱ्यांना माहीतही नसतं की आपल्याला कायदा डावलून इथं आणलं गेलंय! पण २०१८-१९ मध्ये अमेरिकेत बेकायदा आलेले ८०२७ भारतीय होते, त्यांची संख्या २०२२-२३ मध्ये दसपटीनं वाढली, असं अमेरिकी यंत्रणा म्हणत आहेत आणि मुख्य म्हणजे भारत सरकारला हे आकडे मान्य आहेत. राज्यसभेत परराष्ट्र व्यवहार खात्याचे राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांनी गेल्याच आठवड्यात (१४ डिसेंबरच्या गुरुवारी) एका लेखी उत्तरात दिलेल्या माहितीतूनच तर हे अमेरिकी आकडे सामान्य भारतवासीयांपर्यंत पोहोचले आहेत. मुरलीधरन या उत्तरात म्हणतात की, २०१९-२० या कोविड-टाळेबंदी वर्षात फक्त १२२७ भारतीय अमेरिकेत बेकायदा मार्गानं पोहोचले, पण पुढल्याच वर्षी, म्हणजे २०२०-२१ मध्ये ही संख्या ३०,६६२ झाली, २०२१-२२ मध्ये ६३,९२७ आणि २०२२-२३ मध्ये किती? एकंदर ९६९१७ एवढे बेकायदा भारतीय! हे येतात कुठून? यासाठी राज्यसभेतलीच आणखी चर्चा पाहावी लागते. तिथं मुरलीधरन म्हणतात की, ‘अमेरिकेत नोकरी’चं आमिष दाखवून बेकायदा स्थलांतर घडवणाऱ्या सर्वाधिक – म्हणजे ४७१ एजन्सी आंध्र प्रदेशात आहेत. तर उत्तर प्रदेशात ४०० आणि त्याखालोखाल तमिळनाडूत ३६०, महाराष्ट्रात ३०९, दिल्लीत २९२, पंजाबात १९० असा क्रम लागतो.

## संपादकीय »

### नवे मूलद्रव्यास्त्र!


***आणखी काही आठवड्यांनी सुरू होणाऱ्या नवीन वर्षाच्या प्रारंभ-काळात आपल्या पहिल्यावहिल्या ‘दुर्मीळ मृदा मूलद्रव्य’ (रेअर अर्थ्स) खनिज खाण कंत्राटांचा लिलाव होईल.***

आणखी काही आठवड्यांनी सुरू होणाऱ्या नवीन वर्षाच्या प्रारंभ-काळात आपल्या पहिल्यावहिल्या ‘दुर्मीळ मृदा मूलद्रव्य’ (रेअर अर्थ्स) खनिज खाण कंत्राटांचा लिलाव होईल. नरेंद्र मोदी सरकारच्या काळात जी काही महत्त्वाची पावले उचलली गेली; त्यातील हे एक. या लिलावांतून केंद्र सरकारच्या तिजोरीत किमान ४५ हजार कोटी रुपयांची भर पडेल. तंत्रक्षेत्रात भारताच्या प्रगतीसाठी या दुर्मीळ मृदा मूलद्रव्यांचा उपयोग अनन्यसाधारण आहे. याचाही या लिलावात समावेश असेल. हे लिथियम अलीकडे प्रचारात आलेल्या लिथियम बॅट्यांमुळे तसे सर्वास परिचित असते. तथापि लिथियमपेक्षा अधिक उपयुक्त असलेली पण तरी मोठ्या प्रमाणावर अपरिचित अनेक मूलद्रव्ये आहेत. निकेल, टायटॅनियम, मॉलिब्डेनम, ग्राफाइट आदी मूलद्रव्ये अनेक आणि त्यांची घराणीही विविध.

**भारत सरकारने १९५० मध्ये स्थापन केलेली ‘भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद’ अर्थात ‘आयसीसीआर’ ही संस्था सध्याच्या सार्वत्रिक अमेरिकीकरणाच्या काळात भारतीय खाद्यसंस्कृती, महाकाव्ये, वेशभूषा, परंपरा, सण-उत्सव, संगीत-नृत्याचे महत्त्व जगाला पटवून देत आहे.**

# सांस्कृतिक सपाटीकरणाला विरोध!

जागतिक पटलावर भारताच्या ‘सॉफ्ट पॉवर’चे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संस्थेच्या कार्याविषयी संस्थेचे अध्यक्ष, डॉ. विनय सहस्रबुद्धे यांची विशेष मुलाखत.. जगाला भारतीय कला, संस्कृती, साहित्य तसेच समाजजीवनाची ओळख करून देणारी संस्था म्हणून ‘भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद’ (आयसीसीआर) ओळखली जाते. आपल्या ७३ वर्षांच्या वाटचालीत या संस्थेने जगभरात भारताची प्रतिमा उंचावण्याचे काम केले. गेली सहा वर्षे संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा भाजपचे ज्येष्ठ नेते तसेच राजकीय विचारवंत डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्याकडे आहे. जगभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे भारतीयत्वाचा प्रसार संस्थेकडून अव्याहत सुरू आहे. या कार्याला कोणतीही धार्मिक बाजू नाही. संपूर्ण जगाचे झपाट्याने अमेरिकीकरण होत असताना या सांस्कृतिक सपाटीकरणाला विरोध करण्याची क्षमता भारतीय संस्कृतीत आहे, असे ठाम मत डॉ. सहस्रबुद्धे



मांडतात. गेल्या काही वर्षांत जगाचा भारताविषयीचा दृष्टिकोन बदलला आहे. भारतीय संस्कृतीबाबत जाणून घेण्याची उत्सुकता जगात वाढत आहे. भारत एक शक्ती म्हणून झपाट्याने पुढे येत असून, आपली ही विविधता जगापुढे मांडणारा एक सेतू म्हणून आयसीसीआरने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे त्यांनी स्पष्ट केले. १९५० मध्ये तत्कालीन सरकारने या संस्थात्मक स्वरूपाच्या परिषदेची स्थापना केली. तेव्हा ही संस्था शिक्षण खात्याचा एक भाग होती. त्यामुळे ७०च्या दशकापर्यंत केंद्रीय शिक्षणमंत्रीच संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असत. सुरुवात डॉ. अबुल कलाम आझाद यांच्यापासून झाली. पुढे १९७०च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या संस्थेला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा एक भाग केले. कारण या संस्थेचा संबंध परदेशांशी अधिक आहे, असा मतप्रवाह होता. यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष ठरले. पुढे एका टप्प्यावर वसंत साठे हे कोणतेही मंत्रीपद नसतानाही या संस्थेचे अध्यक्ष झाले. १९९० च्या दशकात काही उपराष्ट्रपती या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात २००२ मध्ये नजमा हेपतुल्ला यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली. पुढे करणसिंह तसेच लोकेशचंद्र अशा नामवंतांनी या पदाची जबाबदारी सांभाळली. २०१८ पासून आयसीसीआरच्या अध्यक्षपदाची धुरा माझ्याकडे आहे. आरोग्य मंत्रालय, आयुष तसेच शिक्षण मंत्रालय अशा केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांच्या माध्यमातून भारतात येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना जी शिष्यवृत्ती किंवा पाठ्यवृत्ती दिली जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सोलार स्फोटाचे विधिमंडळात पडसाद

## मृतांच्या वारसांना 50 लाखांच्या मदतीची मागणी

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नागपुरात (NAGPUR) सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेल्या स्फोटाचे पडसाद सोमवारी विधानसभेत देखील उमटताना दिसले. या स्फोटामध्ये आतापर्यंत 9 जणांचा मृत्यू झाला असून या मृतांमध्ये 6 महिला व 3 पुरुषांचा समावेश आहे. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख (ANIL DESHMUKH) यांनी या दुर्घटनेतील मृतकांच्या वारसांना प्रति कुटुंब 50 लाख रूपये मदत दिली जावी. तसेच या प्रकरणी कंपनी मालकावर भादंवि कलम 302 चा गुन्हा देखील दाखल करण्याची मागणी केली आहे.**



नागपूर-अमरावती रोडवर बाजारगाव येथे असलेल्या सोलार एक्सप्लोसिव्ह या डेटोनेटर आणि इतर स्फोटकं बनवणाऱ्या कंपनीत रविवारच्या सकाळी नऊ वाजताच्या सुमारास स्फोट झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत आत्ता पर्यंत 9 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या विषयी सभागृहात आणि सभागृह बाहेर देखील विरोधकांनी सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी कंपनीवर आरोप करत या विषयी सरकारने सखोल चौकशी करून पीडितांना न्याय द्यावा. अशी मागणी केली. या विषयी बोलतांना अनिल देशमुख म्हणाले की, या आधी देखील सोलार इंडस्ट्रीज मध्ये अशा घटना घडल्या असून त्यात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले आहे. या कंपनीत 3 ते 4 हजार लोक काम करतात. यातील बहुतांश कामगार वर्ग हा माझ्या मतदारसंघातील आहे. या दुर्घटनेनंतर येथील कामगारांनी रोष व्यक्त करत या कंपनी विरोधात अनेक तक्रारी केल्या. रविवार सुटीच्या दिवशी देखील कामासाठी बळजबरी केली जाते. अन्यथा कामावरून काढून टाकले जाईल अशी धमकी दिली जाते. ऐकुणात या कंपनीकडून कामगार वर्गाची पिळवणूक होत असल्याचे चित्र आहे. या प्रकरणी सरकारने सखोल चौकशी करावी आणि यातील दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली. नागपूर-अमरावती रोडवर बाजारगाव येथे असलेल्या सोलार एक्सप्लोसिव्ह या डेटोनेटर आणि इतर स्फोटकं बनवणाऱ्या कंपनीत रविवारच्या सकाळी नऊ वाजताच्या सुमारास स्फोट झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत आत्ता पर्यंत 9 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या विषयी सभागृहात आणि सभागृह बाहेर देखील विरोधकांनी सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी कंपनीवर आरोप करत या विषयी सरकारने सखोल चौकशी करून पीडितांना न्याय द्यावा. अशी मागणी केली. या विषयी बोलतांना अनिल देशमुख म्हणाले की, या आधी देखील सोलार इंडस्ट्रीज मध्ये अशा घटना घडल्या असून त्यात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले आहे. या कंपनीत 3 ते 4 हजार लोक काम करतात.

### मृतांमध्ये 6 महिला व 3 पुरुषांचा समावेश

» सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेल्या स्फोटाचे पडसाद सोमवारी विधानसभेत देखील उमटताना दिसले. या स्फोटामध्ये आतापर्यंत 9 जणांचा मृत्यू झाला असून या मृतांमध्ये 6 महिला व 3 पुरूषांचा समावेश आहे. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख (Anil Deshmukh) यांनी या दुर्घटनेतील मृतकांच्या वारसांना प्रति कुटुंब 50 लाख रूपये मदत दिली जावी. तसेच या प्रकरणी कंपनी मालकावर भादंवि कलम 302 चा गुन्हा देखील दाखल करण्याची मागणी केली आहे. नागपूर-अमरावती रोडवर बाजारगाव येथे असलेल्या सोलार एक्सप्लोसिव्ह या डेटोनेटर आणि इतर स्फोटकं बनवणाऱ्या कंपनीत रविवारच्या सकाळी नऊ वाजताच्या सुमारास स्फोट झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत आत्ता पर्यंत 9 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या विषयी सभागृहात आणि सभागृह बाहेर देखील विरोधकांनी सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी कंपनीवर आरोप करत या विषयी सरकारने सखोल चौकशी करून पीडितांना न्याय द्यावा. अशी मागणी केली. निर्माण झालेले स्फोटक पॅकिंग करण्याचं काम सुरू असताना हा स्फोट झाल्याचं सांगण्यात आलं. स्फोटाची तीव्रता इतकी मोठी आणि गंभीर होती की, त्यामध्ये अनेज मजूर गंभीर जखमी झाले. तसेच 9 जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी कंपनी मालकावर भादंवि कलम 302 चा गुन्हा देखील दाखल करण्याची मागणी केली आहे.

यातील बहुतांश कामगार वर्ग हा माझ्या मतदारसंघातील आहे. या दुर्घटनेनंतर येथील कामगारांनी रोष व्यक्त करत या कंपनी विरोधात अनेक तक्रारी केल्या. रविवार सुटीच्या दिवशी देखील कामासाठी बळजबरी केली जाते. अन्यथा कामावरून काढून टाकले जाईल अशी धमकी दिली जाते. ऐकुणात या कंपनीकडून कामगार वर्गाची पिळवणूक होत असल्याचे चित्र आहे. या प्रकरणी सरकारने सखोल चौकशी करावी आणि यातील दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली.

# नक्षल पीडितांचे युद्धपातळीवर पुनर्वसन करण्याचे आदेश

## नक्षलवाद प्रतिबंध राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत मोठा निर्णय

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, (CM EKNATH SHINDE) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADNAVIS) यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पार पडलेल्या नक्षलवाद प्रतिबंध राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला.**

गडचिरोली (Gadchiroli ) भागात नक्षलवादी कारवायांमुळे विस्थापित झालेले पीडित तसेच शरण आलेल्या सर्वांचेच युद्धपातळीवर पुनर्वसन करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. डावी कडवी विचारसरणीबाबत राष्ट्रीय योजना व कृती आराखड्याबाबत एकसूत्री कृती यंत्रणा संरचनेनुसार गठीत राज्यस्तरीय समितीची बैठक आज नागपूररात झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत असतांना त्यांनी ही माहिती दिली. नक्षल्यांच्या कारवाईमुळे गडचिरोली जिल्हा कायम धुमसत असतो. या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरीता शासनाच्या वतीने ठोस पाऊले उचलत प्रयत्न करण्यात येत आहे. नक्षल त्रासाला कंटाळून जे शरण येतात, त्यांचे




पुनर्वसन युद्धपातळीवर होण्याची गरज आहे. या प्रक्रीयेसाठी येणारा खर्च जिल्हा नियोजन योजनेच्या माध्यमातून करण्यात यावा. अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. यासह विशेष पोलीस मोहिमांमध्ये शहीद झालेल्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नेमणुका तातडीने करण्यात याव्यात. शहरी माओवादी रोखण्यासाठी हे विधेयक महत्वाचे ठरणार आहे. मायनिंग कॉरिडॉरच्या रस्त्यांचा विकास, तसेच या परिसरातील मोबाईल टॉवर्सची कामे वेगाने पूर्ण व्हावीत याबाबतही

### पीडितांचे युद्धपातळीवर पुनर्वसन

» नागपूर, गडचिरोली मार्गावरील मॉडर्न फायरिंग रेंजचे काम त्वरीत पूर्ण करण्यात यावे. असे देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. नक्षलवाद प्रतिबंध राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली येथे उभारण्यात येणाऱ्या नव्या पोलिस स्थानकांच्या 25 अधिकारी व 500 कर्मचाऱ्यांच्या पद निर्मितीचे आदेशही या बैठकीत दिले. या सर्व नेमणूका स्थानिक पातळीवर होणार आहेत. महाराष्ट्र पब्लिक सिक्युरिटी ॲक्ट - हे जनसुरक्षा विधेयक लवकरात लवकर आणण्याबाबतही विचार विनिमय झाला. शहरी माओवादी रोखण्यासाठी हे विधेयक महत्वाचे ठरणार आहे. मायनिंग कॉरिडॉरच्या रस्त्यांचा विकास, तसेच या परिसरातील मोबाईल टॉवर्सची कामे वेगाने पूर्ण व्हावीत याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

बैठकीत चर्चा झाली. दरम्यान, राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून जिल्ह्यांच्या अंतर्गत एसटी बस दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ!

## » भारतात कोरोना विषाणू संसर्गाचे 260 नवे रुग्ण

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**प्रकरणांमध्ये झालेली वाढ आणि भारतात JN.1 प्रकाराची पहिली केस आढळून आल्याने केंद्राने अलीकडेच राज्यांना एक ॲडवायजरी जारी करण्यात आली आहे. तसेच सर्व राज्यांना कोविड परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे आवाहन देखील या माध्यमातून करण्यात आले आहे. राज्यांना जिल्हानिहाय SARI आणि ILI प्रकरणांचे नियमितपणे अहवाल द्यावे लागणार आहेत.**

मोठ्या संख्येने RT-PCR चाचण्यांसह इतर चाचण्या देखील सुनिश्चित करण्यासाठी राज्यांना सल्ला देण्यात आलाय. तसेच, जीनोम सिक्वेन्सिंगसाठी सकारात्मक नमुने INSACOG प्रयोगशाळांमध्ये पाठविण्याचा सल्ला देखील यावेळी दिलाय. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सोमवार 18 डिसेंबर रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात कोरोना विषाणू संसर्गाचे 260 नवे रुग्ण आढळून आले आहेत. तसेच सक्रिय रुग्णांची संख्या ही 1,828 वर पोहोचली आहे. सकाळी 8 वाजता अपडेट केलेल्या आकडेवारीनुसार, कोरोनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या ही 5,33,317 इतकी नोंदवली गेली आहे. देशात कोविड रुग्णांची संख्या 4.50 कोटी (4,50,05,076) आहे. आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, या आजारातून बरे झालेल्या लोकांची संख्या 4,44,69,931 झाली आहे. बरे होण्याचा दर 98.81 टक्के आहे. कोरोनामध्ये मृत्यूचे प्रमाण 1.19 टक्के आहे. मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, देशात कोविड लसींचे 220.67 कोटी डोस देण्यात आले आहेत. गेल्या काही वर्षापासून जगाची झोप उडवणाऱ्या कोरोना व्हायरसनं (CORONAVIRUS UPDATES) पुन्हा एकदा धाकधूक वाढवली आहे. कोरोना व्हायरस (CORONAVIRUS) आणि कोरोनाच्या (COVID-19) संसर्गाबाबत पुन्हा एकदा सतर्कतेची परिस्थिती निर्माण झाली आहे. कोविडचा नवा सबव्हेरियंट (NEW SUBVARIANT OF COVID)



भारतात (INDIA CORONA UPDATE) आल्याचं समोर आलं आहे. कोविड-19 चा सबव्हेरियंट JN.1 चं पहिलं प्रकरण केरळमध्ये (KERALA) आढळून आलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं (UNION MINISTRY OF HEALTH) याबाबत माहिती दिली. तसेच, कोरोनानं ग्रस्त असलेल्या रुग्णाचा मृत्यू झाल्याचं वृत्तही समोर येत आहे. 8 डिसेंबर 2023 रोजी केरळमधील तिरुअनंतपुरम येथील काराकुलममध्ये आरटी-पीसीआर पॉझिटिव्ह नमुन्यात हे प्रकरण आढळून आले. 18 नोव्हेंबर 2023 रोजी या नमुन्याची आरटी-पीसीआर पॉझिटिव्ह चाचणी करण्यात आली होती. रुग्णाला इन्फ्लूएंझा सारख्या आजाराची (ILI) सौम्य लक्षणे होती आणि तो रुग्ण कोविड-19 मधून बरा झाला होता. गेल्या काही आठवड्यांपासून केरळ राज्यामध्ये कोविड-19 च्या रुग्ण संख्येत वाढ होत आहे. चाचणीसाठी पाठवण्यात आलेल्या इन्फ्लूएंझा सारख्या आजारांच्या प्रकरणांमधील नमुन्यांच्या संख्येत वाढ हे याचे कारण आहे. यापैकी बहुतेक रुग्णांना वैद्यकीयदृष्ट्या सौम्य लक्षणे आहेत आणि हे रुग्ण

### केरळमध्ये आढळून आला व्हेरिएंट

» 8 डिसेंबर 2023 रोजी केरळमधील तिरुअनंतपुरम येथील काराकुलममध्ये आरटी-पीसीआर पॉझिटिव्ह नमुन्यात हे प्रकरण आढळून आले. 18 नोव्हेंबर 2023 रोजी या नमुन्याची आरटी-पीसीआर पॉझिटिव्ह चाचणी करण्यात आली होती. रुग्णाला इन्फ्लूएंझा सारख्या आजाराची (ILI) सौम्य लक्षणे होती आणि तो रुग्ण कोविड-19 मधून बरा झाला होता. गेल्या काही आठवड्यांपासून केरळ राज्यामध्ये कोविड-19 च्या रुग्ण संख्येत वाढ होत आहे. चाचणीसाठी पाठवण्यात आलेल्या इन्फ्लूएंझा सारख्या आजारांच्या प्रकरणांमधील नमुन्यांच्या संख्येत वाढ हे याचे कारण आहे. यापैकी बहुतेक रुग्णांना वैद्यकीयदृष्ट्या सौम्य लक्षणे आहेत आणि हे रुग्ण कोणत्याही उपचाराशिवाय त्यांच्या घरीच स्वतःहून बरे होत आहेत.

कोणत्याही उपचाराशिवाय त्यांच्या घरीच स्वतःहून बरे होत आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सोमवार 18 डिसेंबर रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात कोरोना विषाणू संसर्गाचे 260 नवे रुग्ण आढळून आले आहेत. तसेच सक्रिय रुग्णांची संख्या ही 1,828 वर पोहोचली आहे. सकाळी 8 वाजता अपडेट केलेल्या आकडेवारीनुसार, कोरोनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या ही 5,33,317 इतकी नोंदवली गेली आहे. देशात कोविड रुग्णांची संख्या 4.50 कोटी (4,50,05,076) आहे. आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, या आजारातून बरे झालेल्या लोकांची संख्या 4,44,69,931 झाली आहे. 98.81 टक्के आहे. कोरोनामध्ये मृत्यूचे प्रमाण 1.19 टक्के आहे. मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, देशात कोविड लसींचे 220.67 कोटी डोस देण्यात आले आहेत. प्रकरणांमध्ये झालेली वाढ आणि भारतात JN.1 प्रकाराची पहिली केस आढळून आल्याने केंद्राने अलीकडेच राज्यांना एक ॲडवायजरी जारी करण्यात आली आहे.

# केजरीवाल यांना पुन्हा ईडीची नोटीस

## » 21 डिसेंबर रोजी हजर राहण्यास सांगितले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) (ED) दिल्लीचे मुख्यमंत्री (DELHI CM) आणि आम आदमी पक्षाचे (आप) प्रमुख अरविंद केजरीवाल (ARWIND KEJRIWAL) यांना चौकशीसाठी समन्स पाठवण्यात आले आहे. दिल्ली अबकारी प्रकरणाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने त्यांना 21 डिसेंबर रोजी हजर राहण्यास सांगितले आहे.**



यापूर्वी 2 नोव्हेंबरला ईडीने अरविंद केजरीवाल यांना चौकशीसाठी नोटीस पाठवली होती, मात्र त्यांनी ही नोटीस बेकायदेशीर ठरवून ती मागे घेण्याची मागणी केली होती. त्याच दिवशी अरविंद केजरीवाल हे मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीसंदर्भात रोड शोमध्ये सहभागी झाले होते. दरम्यान आता पुन्हा एकदा अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून समन्स बजावण्यात आले. अरविंद केजरीवाल विपश्यना केंद्रात जाणार असताना त्यांना हे समन्स पाठवण्यात आले आहे. पीटीआय वृत्तसंस्थेनुसार, शनिवार 16 डिसेंबर रोजी अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, केजरीवाल 10 दिवसांच्या विपश्यना ध्यान कार्यक्रमात सहभागी होतील. त्याच वेळी अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून समन्स बजावण्यात आले आहे. दिल्ली विधानसभेचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी केजरीवाल मंगळवार 19 डिसेंबर रोजी दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती देण्यात आलीये. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह हे अबकारी धोरणाशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात न्यायालयीन कोठडीत आहेत. इतर आरोपींच्या चौकशीच्या आधारे ईडीला केजरीवाल यांची चौकशी करायची आहे. त्याच पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना देखील आता ईडीची नोटीस बजावण्यात आलीये. आम आदमी पार्टी (आप) दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी आपल्या नेत्यांवरील कारवाईला राजकीय षडयंत्र म्हणत आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाची भेट!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ((DEARNESS ALLOWANCE)) चार टक्के वाढ करण्याची घोषणा पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी केली आहे. ही वाढ डिसेंबरपासून लागू होणार आहे. या वाढीनंतर DA 38 टक्के होणार असल्याची माहिती पंजाब स्टेट मिनिस्ट्री अलाईड सर्व्हिसेस युनियन (PSMSU) चे अध्यक्ष अमर सिंग यांनी दिली. नवीन वर्षाच्या आगमनापूर्वी पंजाब सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना खुशखबर दिली आहे. पंजाबमधील सरकारी कर्मचाऱ्यांना जाहीर करण्यात आला आहे. पंजाब सरकारनं दिलेल्या म्हणण्यानुसार डिसेंबर महिन्यापासून हा DA लागू होणार आहे. महागाई भत्यात वाढ करावी अशी सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी होती. पंजाब सरकारची मंत्रीमंडळाची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी सोमवारी सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात (DA) चार टक्के वाढ करण्याची घोषणा केली आहे. ही वाढ डिसेंबरपासून लागू होणार आहे. पंजाब स्टेट मिनिस्ट्री अलाईड सर्व्हिसेस युनियन (PSMSU) चे अध्यक्ष अमर सिंग यांनी सांगितले की, वाढीनंतर DA 38 टक्के होईल. पीएसएमएसयूच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

# बाईपण भारी देवा'चे स्पेशल स्क्रीनिंग

केदार शिंदे दिग्दर्शित 'बाईपण भारी देवा' (BAIPAN BHAARI DEVA) चित्रपट सरत्या वर्षातला बॉक्स ऑफिसवर आणि प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलेला मराठी चित्रपट ठरला. 'बाईपण भारी देवा' प्रदर्शित होऊन आता अनेक महिने लोटले तरीदेखील प्रेक्षकांमध्ये या कलाकृती विषयीचा उत्साह तसूभरही कमी झालेला दिसत नाही. अजूनही पुन्हा पुन्हा चित्रपटाचा आनंद घेण्यासाठी अनेकजण उत्सुक दिसत आहेत. खरंतर प्रदर्शनाआधीच प्रेक्षकांमध्ये 'बाईपण भारी देवा' विषयी कमालीची उत्सुकता पहायला मिळाली होती, बॉक्सऑफिसवर हा चित्रपट कमाल करेल अशी चर्चाही रंगली होती. आणि अगदी तसंच सगळं घडत गेलं. हे फक्त आणि फक्त शक्य झालं ते मायबाप प्रेक्षकांमुळेच. 'बाईपण भारी देवा' या चित्रपटाचे यश साजरं करत निर्माती माधुरी भोसले यांच्यातर्फे 16 डिसेंबर रोजी मुंबईत या सिनेमाचे स्पेशल स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले होते. चित्रपटाचे निर्माते, कलाकार आणि संपूर्ण क्रू यावेळेस उपस्थीत होते. विशेष म्हणजे मुंबईचे डब्बेवाले आपल्या धकाधकीच्या जीवनात थोडासा विरंगुळा म्हणून चित्रपट पाहण्यास आवर्जून उपस्थित होते.आनंदाची गोष्ट म्हणजे आताही हा विशेष शो हाऊसफुल ठरला होता!




# पापाराझीला पाहताच लाजली नव्या

बॉलिवूडमधील स्टारकिड्स हे त्यांच्या पर्सनल लाईफमुळे खूप चर्चेत असतात. सध्या अमिताभ बच्चन (AMITABH BACHCHAN) यांचा नातू अगस्त्य नंदा (AGASTYA NANDA) हा त्याच्या द आर्चिज या चित्रपटामुळे चर्चेत आहे. पण बिग बींची नात नव्या नवेली नंदा (NAVYA NAVELI NANDA) ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. नव्या आणि अभिनेता सिद्धांत चतुर्वेदी (SIDDHANT CHATURVEDI) यांच्या अफेअरच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर होत आहेत. अशातच नव्यानं सिद्धार्थच्या 'खो गए हम कहां' (KHO GAYE HUM KAHAN) या चित्रपटाच्या स्क्रिनिंगला हजेरी लावली. बिग बींची नात नव्या नवेली नंदा आणि सिद्धांत चतुर्वेदी यांना अनेकदा एकत्र स्पॉट करण्यात आलं. त्यामुळे त्यांच्या अफेअरच्या चर्चा सोशल मीडियावर होऊ लागल्या आहेत. नव्या नवेली नंदा तिचा रुमर्ड बॉयफ्रेंड सिद्धांत चतुर्वेदीच्या 'खो गये हम कहां' या आगामी चित्रपटाच्या स्क्रिनिंगला हजेरी लावली. स्क्रिनिंगला आलेल्या नव्याचे फोटो पापाराझीनं काढले. पापाराझीला पाहताच नव्या लाजली. त्यामुळे आता नव्या आणि सिद्धार्थ यांच्या नात्याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होत आहे. सिद्धांत चतुर्वेदी आणि अनन्या पांडे यांचा 'खो गये हम कहां' हा चित्रपट 26 डिसेंबरला ओटीटीवर प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाच्या रिलीजच्या आधी या चित्रपटाच्या स्पेशल स्क्रिनिंगचे आयोजन करण्यात आले होते. 'खो गये हम कहां' चित्रपटाच्या स्क्रिनिंगला अनेक स्टार्स पोहोचले होते. मात्र अमिताभ बच्चन यांची नात नव्या नवेली नंदा हिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. निखिल द्विवेदी, जन्नत जुबेर आणि 'खो गये हम कहां' चित्रपटाची स्टार कास्ट या सर्वांनी या स्क्रिनिंगला हजेरी लावली होती.

# किंग खान 'छैय्या छैय्या' गाण्यावर थिरकला

अभिनेता शाहरुख खान (SHAH RUKH KHAN) हा सध्या त्याच्या डंकी (DUNKI) या चित्रपटाचं प्रमोशन करत आहेत. डंकी या चित्रपटाचं प्रमोशन करण्यासाठी शाहरुख दुबई येथे गेला होता. दुबईतील इव्हेंटमध्ये शाहरुखनं झुमे जो पठाण (JHOOME JO PATHAAN), लुट पूट गया (LUTT PUTT GAYA) आणि छैय्या छैय्या (CHAIYYA CHAIYYA) या गाण्यांवर डान्स केला. त्याच्या छैय्या छैय्या या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमधील शाहरुखच्या डान्सनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. दुबईतील डंकी चित्रपटाच्या प्रमोशन इव्हेंटमध्ये शाहरुख खाननं छैय्या छैय्या या गाण्यावर डान्स केला. शाहरुखच्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी शाहरुखचं कौतुक केलं आहे. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "म्हणूनच त्याला किंग खान म्हणतात." 1998 मध्ये प्रदर्शित झालेल्या दिल से या चित्रपटातील छैय्या छैय्या हे गाणं लोक आजही आवडीनं ऐकतात. चालत्या ट्रेनमध्ये 'छैय्या छैय्या' हे गाणं शूट करण्यात आले. या गाण्यात शाहरुखसोबतच मलायका आरोरानं देखील डान्स केला आहे. राजकुमार हिरानी यांनी दिग्दर्शित केलेला 'डंकी' हा चित्रपट 21 डिसेंबर रोजी रिलीज होणार आहे. या चित्रपटात शाहरुखसोबतच तापसी पन्नूने मुख्य भूमिका साकारली आहे. तसेच विकी कौशल, बोमन ईरानी यांनी देखील या चित्रपटात काम केलं आहे. 'लुट-पुट गया', 'निकले दी कभी हम घर से' आणि 'ओ माही' ही डंकी ' या चित्रपटाची तीन गाणी रिलीज झाली आहेत. यामधील 'ओ माही' या गाण्यात शाहरुख आणि तापसीच्या अप्रतिम केमिस्ट्रीची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळाली आहे. 2023 हे वर्ष शाहरुखसाठी खास होतं. यावर्षी रिलीज झालेल्या त्याच्या पठाण आणि जवान या चित्रपटांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. आता पठाण आणि जवान या चित्रपटांप्रमाणेच शाहरुखचा डंकी हा चित्रपट देखील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणार का? याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.



# लंडनमधील संग्रहालयात रणवीर सिंहचा मेणाचा पुतळा

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता रणवीर सिंहचा (RANVEER SINGH) चाहता वर्ग मोठा आहे. त्याचे चाहते केवळ भारतातच नाही तर जगभरात आहेत. गली बॉय रणवीर त्याच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकत असतो. आता रणवीरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवण्यात आला आहे. लंडनमधील मादाम तुसाद म्युझियममध्ये (MADAME TUSSAUDS LONDON) रणवीर सिंहचा मेणाचा पुतळा ठेवण्यात आला आहे. या म्युझियममध्ये रणवीरचे एक नाही तर दोन मेणाचे पुतळे ठेवण्यात आले आहेत. या मेणाच्या मुतळ्यांचे फोटो रणवीरनं सोशल मीडियावर शेअर केले आहेत. रणवीरनं त्याच्या दोन मेणाच्या पुतळ्यांचे फोटो शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं,"मोठे झाल्यावर, जगातील काही प्रसिद्ध आणि प्रमुख व्यक्तींसोबत माझ्या आई-वडिलांचे जुने फोटो पाहून मला भुरळ पडली, फक्त ते लंडनच्या प्रसिद्ध मादाम तुसादमधील आहेत हे मला नंतर कळाले.




त्या पौराणिक वस्तुसंग्रहालयाचे आकर्षण मला वाटत होते, आता तेथे माझा स्वतःचा मेणाचा पुतळा तयार करण्यात आले आहेत. माझा पुतळा जगातील सर्वात कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांमध्ये उभा असल्याने मला कृतज्ञता वाटते. एक अविस्मरणीय क्षण,मला या क्षणापर्यंत घेऊन गेलेल्या माझ्या जादुई सिनेमॅटिक प्रवासाचे मी चिंतन केले" रणवीरनं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमधील मेणाचे पुतळे कोणते आणि खरा रणवीर कोणता? असा प्रश्न सध्या अनेकांना पडला आहे. यामधील डोळ्यावर गॉगल असणारा खरा रणवीर आहे. तर पिंक जॅकेट परिधान केलेला आणि ब्लॅक प्रिंटेड कोट परिधान केलेला रणवीरचा मेणाचा पुतळा आहे. अनेक सेलिब्रिटींनी रणवीरनं शेअर केलेल्या फोटोला कमेंट करुन त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. रणवीर सिंहच्या हा लवकरच रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' या चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटातील रणवीरचा फर्स्ट लूक रिलीज करण्यात आला होता. या मल्टीस्टारर चित्रपटात रणवीर संग्राम भालेरावच्या भूमिकेत दिसणार आहे. सिंघम अगेनमध्ये दीपरा पदुकोण, अजय देवगण, करीना कपूर, अक्षय कुमार हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# या खेळाडूंवर पडणार पैशांचा पाऊस!

## » आयपीएल 2024 लिलाव काही तासांवर येऊन ठेपला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल 2024 साठीचा मिनी लिलाव काही तासांवर येऊन ठेपला आहे. मंगळवारी दुपारी आयपीएलचा लिलाव पार पडणार आहे. लिलावात अनेक खेळाडूंवर पैशांचा पाऊस पडणार आहे. तर काही खेळाडू अनसोल्ड राहू शकतात. अनुभवी आणि युवा खेळाडूंना घेण्यासाठी दहा संघामध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. दुबईत होणाऱ्या आयपीएल लिलावात कोण कोणते खेळाडू महागडे ठरु शकतात, याबाबत अनेक तर्क वितर्क लगावले जातात. पाहूयात कोण कोणते खेळाडू लिलावात महागडे ठरु शकतात, याबाबत...**




मिचेल स्टार्क आठ वर्षानंतर आयपीएलमध्ये कमबॅक करतोय. 2015 पासून मिचेल स्टार्क आयपीएलमध्ये खेळला नाही. नुकताच झालेला विश्वचषकात मिचेल स्टार्कसाठी शानदार होता. यंदाच्या लिलावात मिचेल स्टार्कचे नाव निश्चित मानले जातेय. डावखुऱ्या मिचेल स्टार्कवर पैशांचा पाऊस पडू शकतो.

मिचेल स्टार्कची बेस प्राईज दोन कोटी रुपये इतकी आहे. लिलावात वेगवान गोलंदाजांवर मोठी बोली लागण्याची शक्यता आहे. स्टार्कला बेस प्राईजपेक्षा पाचपट रक्कम मिळू शकते. न्यूझीलंडच्या युवा रचिन रविंद्र याने यंदाच्या विश्वचषकात धावांचा पाऊस पाडला. फलंदाजीसोबत तो गोलंदाजीतही तरबेज आहे. त्यामुळे लिलावात रचिन रविंद्र महागडा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. रचिन रविंद्र याने आपली बेस प्राईज 50 लाख रुपये इतकी ठेवली आहे. त्याला दहा पठ जास्त रक्कम मिळू शकते. भारताचा अष्टपैलू शार्दूल ठाकूर मिनि आयपीएल लिलावात मालामाल होण्याची शक्यता आहे. कोलकाता संघाने त्याला रिलिज केले होते, त्यानंतर तो आता लिलिवात सामील होतोय.

गोलंदाजीसह शेवटच्या षटकात फटकेबाजीसाठी शार्दूल ठाकूरला ओळखलं जाते. शार्दूलची बेस प्राईद दोन कोटी रुपये आहे. जेराल्ड कोएत्जी याने यंदाची विश्वचषक स्पर्धा गाजवली. त्याने गोलंदाजीत प्रभावी मारा करत सर्वांचेच मन जिंकले. यंदाच्या लिलावात जेराल्ड कोएत्जी याच्यावर कोट्यवधीची बोली लागण्याची अटकळ व्यक्त केली जातेय. जेराल्ड कोएत्जी याने बेस प्राईज दोन कोटी ठेवली आहे. भारताचा वेगवान गोलंदाज हर्षल पटेल यंदाच्या लिलावात सामील झालाय. त्याला आरसीबीने रिजिल केले होते. त्याने आपली बेस प्राईज दोन कोटी रुपये ठेवली आहे. हर्षल पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करु शकतो. हर्षेल पटेल स्लोअर चेंडू फेकण्यात तरबेज आहे. लंकेचा अष्टपैलू वानंदु हसरंगा याच्यावरही सर्वांच्या नजरा असतील. अरसीबीने त्याला रिलिज करत सर्वांनाच चकीत केले होते. आरसीबीसाठी हसरंगा यशस्वी ठरला होता, तरीही त्याला रिजिल करण्यात आले होते. तो फिरकी गोलंदाजीसह फलंदाजीही करु शकतो. त्यामुळे हसरंगाला घेण्यासाठी चूरस पाहायला मिळू शकते. सनरायझर्स हैदराबादचे माजी मुख्य प्रशिक्षक टॉम मूडी यांनी आयपीएल २०२४च्या लिलावाबाबत काही अंदाज वर्तवले आहेत. त्यांच्या मते, ऑस्ट्रेलियाचा मधल्या फळीतील फलंदाज स्टीव्ह स्मिथला कोणीही खरेदीदार सापडणार नाही. अनेक वर्षांनंतर मिचेल स्टार्क आयपीएल लिलावात सहभागी होणार आहे, त्यामुळे त्याची सर्वाधिक किंमतीला विक्री होण्याची शक्यता आहे, असे मूडीने म्हटले आहे. क्रिकइन्फोला दिलेल्या मुलाखतीत, टॉम मूडीने आयपीएल २०२४ लिलावाबाबत पाच अंदाज उघड केले. तो म्हणाला, “मला वाटते की स्टीव्ह स्मिथला आयपीएल लिलावात कोणीही खरेदीदार सापडणार नाही. स्टीव्ह स्मिथने आपला शेवटचा आयपीएल सामना २०२१मध्ये खेळला होता.” दुसरीकडे, टॉम मूडीने असेही सांगितले की, “यावेळी आयपीएल २०२४ मध्ये कोणत्या खेळाडूला सर्वाधिक बोली लागू शकते आणि सॅम करनचा १८ कोटी ५० लाख रुपयांचा विक्रम कोण मोडू शकतो, हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.” मूडी पुढे म्हणाले, “मला वाटते की मिशेल स्टार्क यावेळी सॅम करनचा १८ कोटी ५० लाख रुपयांचा लिलाव विक्रम मोडू शकतो आणि त्याची बोली त्यापेक्षा जास्त असू शकते.” टॉम मूडीने शाहरुख खानबद्दल भविष्यवाणी केली आणि म्हणाले, “चेन्नई सुपर किंग्ज या लिलावात शाहरुख खानला विकत घेतील आणि त्यांची बोली ९ कोटींच्या पुढे जाणार आहे.

### शार्दुल ठाकूरला मोठी रक्कम

» मॉक ऑक्शनमध्ये गुजरात टायटन आणि सनरायझर्स हैदराबादने सर्वाधिक बोली लावली. यावेळी जीटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पार्थिव पटेलने १८.५ कोटी रुपयांना जेराल्ड कोएत्झीला खरेदी केले. तसेच ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नेमक्या याच किमतीत विकत घेतले. तर ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सला हैदराबादने १७.५० कोटींना विकत घेतले. भारतीय खेळाडूंबद्दल जर बोलायचे झाले तर शार्दुल ठाकूरला मोठी रक्कम मिळाली.

# ऑस्ट्रेलियाने बॉक्सिंग-डे कसोटीसाठी संघ केला जाहीर

## » पाकिस्तानला मालिका वाचवण्यासाठी विजय आवश्यक

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाने मेलबर्न येथे पाकिस्तानविरुद्धच्या बॉक्सिंग-डे कसोटीसाठी आपला १३ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप विजेत्या संघाने रविवारी पर्थमध्ये ३६० धावांनी शानदार विजय नोंदविला. त्या विजयी संघात ऑस्ट्रेलियन संघ व्यवस्थापनाने फारसा बदल केलेला नाही.**




यावेळी १४ खेळाडूंचा संघ घोषित करण्याऐवजी ऑस्ट्रेलियाने एक खेळाडू कमी म्हणजे १३ खेळाडूंचा संघ निवडला आहे. अनकॅप्ड वेगवान गोलंदाज लान्स मॉरिसला देशांतर्गत स्पर्धेत खेळण्यासाठी करण्यासाठी संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. अशा स्थितीत दुसऱ्या कसोटीतही मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि कर्णधार पॅट कमिन्स हे अनुभवी त्रिकूट वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करताना दिसणार आहे. त्याचबरोबर स्कॉट बोलँडच्या रूपाने संघाकडे आणखी एक पर्याय त्यांच्याकडे आहे. ऑस्ट्रेलियन संघ व्यवस्थापनाने प्लेइंग-११ मध्ये बदल केल्यास स्टार्कला विश्रांती दिली जाऊ शकते आणि त्याच्या जागी बोलंडचा संघात समावेश केला जाऊ शकते. याशिवाय युवा अष्टपैलू कॅमेरून ग्रीन हा आणखी एक खेळाडू आहे जो प्लेइंग-११ मध्ये स्थान मिळविण्याच्या शर्यतीत आहे. मात्र, संघात गरज असेल तरच बदलांचा विचार करू, असा विश्वास कर्णधार पॅट कमिन्सने व्यक्त केला. तो म्हणाला, “मला वाटत नाही की दुखापत ही समस्या असेल. माझ्या माहितीनुसार पर्थमधील विजयानंतर सर्व गोलंदाज ताजेतवाने आहेत. उन्हाळ्याची ही चांगली सुरुवात आहे, आम्हाला आशा आहे की ही मालिका पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी पाकिस्तानच्या खुर्रम शहजादचा चेंडू लाबुशेनच्या उजव्या हाताच्या बोटावर लागला. २६ डिसेंबर रोजी होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी तो वेळेत तंदुरुस्त होण्याची अपेक्षा आहे. पाकिस्तानच्या पराभवानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत झालेल्या बदलांबद्दल जर बोलायचे झाल्यास ऑस्ट्रेलिया सध्या ४१.६७ गुणांसह WTC क्रमवारीत पाचव्या स्थानावर आहे, तर पाकिस्तान ६६.६७ टक्के गुणांसह भारतानंतर दुसऱ्या स्थानावर आहे.

### पाकिस्तानचा 360 धावांनी पराभव

» जर सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ३६० धावांनी पराभव केला आहे. रविवारी कसोटीचा चौथा दिवस होता आणि कांगारूंनी चौथ्या दिवशीच पाकिस्तानचा पराभव केला. ऑस्ट्रेलियन संघाने पाकिस्तानला ४५० धावांचे लक्ष्य दिले होते.